नियमित दिवाणी दावा क्र.४३/२०१९
सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००१९७–२०१९

निशाणी क्र.१२५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे कथन असे की, सदरील दावा वादीने प्रतिवादी विरुध्द शाखावार वाटपासाठी दाखल केला आहे. तरी सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.७ड श्रीमती प्राजक्ता प्रकाश घाडी या मयत असल्याचे बेलीफ रिपोर्ट वरुन समजून येते. मात्र वादीस माहिती मिळू शकलेली नाही. सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द शाखावार वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.७अ ते ७क व ७इ हे याकामी मूळ प्रतिवादी क्र.७ चे वारस दाखल आहेत. सबब, प्रतिवादी क्र.७ड श्रीमती प्राजक्ता प्रकाश घाडी हिचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे व तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल योग्य तो आदेश करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटपा करिता दाखल केलेला आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता नि.क्र.१२४ वरील बेलिफ रिपोर्ट वरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.७ड या मयत झाल्या आहेत. वादी यांनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, मयत प्रतिवादी क्र.७ड यांचे वारस या पुर्वीच दाव्यामध्ये दाखल आहेत. त्यामुळे अन्य कोणीही वारस अभिलेखावर घेण्याचा प्रश्न उरत नाही. त्यामुळे वादी यांच्या अर्जामध्ये तथ्य असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण

एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्त्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज नि.क्र.१२५ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.01.14 15:57:22 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड

दिनांकः १४/०१/२०२६